Letter 201

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

शास्त्री नगर, अमरावती

Emai ID – divsecamt@rediffmail.com Office Phone No.- 0721-2662647

पत्र क्र.अविमं/उमागो/ 2206
दिनांक- २८ /०१/२०२२
01-02-2022

**प्रति,**

**मुख्याध्यापक/प्राचार्य,**
सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये
अमरावती विभाग, अमरावती

**विषय :- कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर आयोजित उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२वी) परीक्षा मार्च-एप्रिल२०२२ च्या प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात मार्गदर्शक सूचना व विषयनिहाय सुधारित नियोजनाबाबत.**

**संदर्भ** :- पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/४६४, पुणे -०४, दिनांक २५/०१/२०२२.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च-एप्रिल २०२२ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा अंतर्गत लेखी परीक्षा दिनांक ०४/०३/२०२२ ते ३०/०३/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.तसेच इ.१२ वी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व इतर अंतर्गत मूल्यमापन परीक्षा दिनांक १४/०२/२०२२ ते दिनांक ०३/०३/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

तसेच मंडळाने उपरोक्तप्रमाणे निर्धारीत केलेल्या कालावधीत विद्यार्थी कारोनाबाधित झाल्यामुळे अथवा अन्य वैद्यकीय/अपरिहार्य कारणांमुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प व तत्सम परीक्षा देऊ न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची सदर परीक्षा लेखी परीक्षेनंतर दिनांक ३१/०३/२०२२ ते १८/०४/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात यावी. **Out of Turn चा कालावधी उपरोक्त कालावधीतच समाविष्ट असेल त्यामुळे Out of Turn साठी स्वतंत्र कालावधी देण्यात येणार नाही.** या कालावधीतील परीक्षांसाठी कोणतेही वेगळे शुल्क आकारण्यात येऊ नये.

उपरोक्त प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षांना प्रविष्ट होणाऱ्या परीक्षार्थ्यांसाठी व अन्य घटकांसाठी कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर विशेष मार्गदर्शक सूचना व विषयनिहाय सुधारित नियोजन मंडळामार्फत निश्चित करण्यात आलेले आहे. सदर सूचना व विषयनिहाय सुधारित नियोजन पत्रासोबत जोडण्यात येत असून आपण सर्व परीक्षार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. विशेष मार्गदर्शक सूचनांची काटेकोर अंमलबजावणी होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

01.2.2022
**(उल्हास नरड)**
**विभागीय सचिव**
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती

**सहपत्रः-** प्रात्यक्षिक परीक्षेसाठी विशेष मार्गदर्शक सुचना व विषयनिहाय नियोजन एकुण पृष्ठे १ ते १०

Scanned by TapScanner